**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५**
**(प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिद्धी)**
**जाहीर सूचना**

धुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे कडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.४१/का-०५ दि.१३/११/२०२५ अन्वये मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदर प्रारूप मतदार यादी खालील ठिकाणी अवलोकनार्थ प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) म.जिल्हा सह आयुक्त, नगरविकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे
२) निवडणुक शाखा, नविन प्रशासकीय इमारत धुळे महानगरपालिका कार्यालय, धुळे
३) अधिक्षक, रेकॉर्ड विभाग, जुनी मनपा,धुळे
४) धुळे महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.dhulecorporation.org

| अ.क्र | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | राज्य निवडणुक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकी करीता तयार केलेली प्रारुप मतदार यादी, हरकती व सूचना मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्याचा दिनांक | दि. २०/११/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २७/११/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत शासकीय सुट्टी सोडुन |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारण्याचे ठिकाण | मुख्य टपाल कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, धुळे महानगरपालिका, धुळे |
| ४ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिद्ध करणे. | ०५/१२/२०२५ |
| ५ | मतदार केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे | ०८/१२/२०२५ |
| ६ | मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे | १२/१२/२०२५ |

मा. राज्य निवडणुक आयोगाचे आदेश जा.क्र रानिआ/ग्रापनि२०२३/प्र.क्र ०३/का-८ दि १६ जुलै २०२५ मधील मुद्दा क्र ०६ मध्ये खालील नमुद केल्या प्रमाणे हरकती व सूचना स्विकारल्या जातील.

टीप-

१) हरकतदाराने विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या पुराव्यासह सादर करणे आवश्यक असेल.
२) कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा एकत्रित यादींच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
३) विहित नमुन्यातील अर्ज नमुना अ व ब महानगरपालिका कार्यालय येथे उपलब्ध आहे.
४) प्रारुप मतदार यादी शुल्क भरुन रेकॉर्ड विभागात मिळेल.

ठिकाण :- धुळे महानगरपालिका
जा.क्र/धुमपा/निवडणुक/ ८९
दिनांक :१९/११/२०२५

**(नितीन गुलाबराव कापडणीस)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**